उपविभागीय अधिकारी,तथा उपविभागीय दंडाधिकारी,वर्धा यांचे कार्यालय
महात्मा गांधी पुतळयाजवळ सिव्हील लाईन, सेवाग्राम रोड, वर्धा
Email- Sdowardha@gmail.com दुरध्वनी क्र. 07152- 242561

वाचा :- 1. अर्जदार श्री. गणेशलाल मोतीलाल साहु रा. वर्धा ता. जि.वर्धा यांचा दिनांक.01/01/2020 चाअर्ज.
2. तहसिलदार, वर्धा यांनी प्रकरणातील मूळ अकृषक प्रकरण क्र.एन.ए.पी-34/ सावंगी (मेघे) -43/1984-85 दिनांक.20/03/1985 याला अकृषक मंजूरी दिलेली आहे
3. या कार्यालयाकडून दिनांक. 13/01/2020 रोजी प्रसिध्द करण्यात आलेला जाहीरनामा.
4. नगर रचनाकार, वर्धा यांनी त्यांचे पत्र क्र. 550/2020 दिनांक. 06/03/2020 चा नाहरकत प्रमाणपत्र बाबत मजुंरी अहवाल.
5. तलाठी सावंगी (मेघे) यांनी त्यांचे पत्र यांचे दिनांक. 05/02/2020 चा नाहरकत प्रमाणपत्र बाबत अहवाल

प्र.क्रं. 80/ किरकोळ- 80 /19-2020
मौजा- सावंगी (मेघे) ता. जि.वर्धा
दिनांक :- 22/06/2020

विषय:- मौजा सावंगी (मेघे) ता.जि.वर्धा येथिल सर्वे क्र. 422 मधील भूखंड क्रं. 21,22, 23 व 24आराजी 669.16 चौ.मि. ची एकत्रिकरण बाबत.

आदेश
(**पारीत दिनांक**- 22/06/ 2020)

ज्याअर्थी श्री. गणेशलाल मोतीलाल साहु रा. वर्धा ता. जि.वर्धा या कार्यालयाला यांनी मौजा सावंगी (मेघे) ता.जि.वर्धा येथिल सर्वे क्र. 422 मधील भूखंड क्रं. 21,22, 23 व 24आराजी 669.16 चौ.मि. ची एकत्रिकरण करून देण्यास विनंती केली आहे.

ज्याअर्थी अर्जदाराचे अर्जाचे अनूषंगाने नगर रचनाकार वर्धा, यांचा अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र. सिरस्तेदार/उविअ/कावि- 50/2020 दि.13/01/2020 अन्वये मागविण्यात आला.

ज्याअर्थी प्रकरणात नगर रचनाकार, वर्धा यांनी त्यांचे पत्र क्र. 550/2020 दिनांक. 06/03/2020 शिफारस केली आहे.

ज्याअर्थी प्रकरणातील मूळ अकृषक प्रकरण क्र.एन.ए.पी-34/सावंगी (मेघे) -43/1984-85 दिनांक. 20/03/1985 अन्वये तहसिलदार, वर्धा यांनी मंजूरी दिलेली आहे

ज्याअर्थी या कार्यालयाकडून दिनांक. 13/01/2020 रोजी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आलेला आला त्यानूसार अदयापपावेतो कोणताही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

ज्याअर्थी प्रकरणात तलाठी सावंगी (मेघे) यांनी त्यांचे पत्र यांचे दिनांक 05/02/2020 नूसार नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

त्याअर्थी प्रकरणात अर्जदाराने सहपत्रित केलेली सर्व कागदपत्रे व प्राप्त नाहरकत प्रमाणपत्र या सर्व बाबींचा विचार करता मौजा सावंगी (मेघे) ता.जि.वर्धा येथिल सर्वे क्र. 422 मधील भूखंड क्रं. 21,22, 23 व 24आराजी 669.16 चौ.मि. ची खालील प्रमाणे एकत्रिकरण करण्यास अर्जदार श्री. गणेशलाल मोतीलाल साहु रा. वर्धा ता. जि.वर्धा यांना परवानगी खालील शर्ती व अटींचे अधीन राहून प्रदान करण्यात येत आहे.

पुढिल पानावर-

एकत्रिकरण करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आलेल्या जमीनीचा तपशिल

सर्वे क्र. भुखंड क्र व आराजी	भुखंड धारकाच नाव	भुखंड क्र	7/12 प्रमाणे भुखंडाची एकुण आराजी	कॉनर ऐरीया कपात	भुखंडाची निव्वळ आराजी चौ.मि. मध्ये
मौजा सावंगी (मेघे) ता.जि.वर्धा येथिल सर्वे क्र. 422 मधील भूखंड क्रं. 21,22, 23 व 24आराजी 669.16 चौ.मि.	श्री. गणेशलाल मोतीलाल साहु रा. वर्धा ता. जि.वर्धा	21	167.29	-	167.29
		22	167.29	-	167.29
		23	167.29	-	167.29
		24	167.29	-	167.29
			669.16	-	669.16

आदेश पारीत संबंधितांस कळवा

शर्ती व अटी

1.सदर एकत्रिकरण फक्त निवासी वापराकरीता अनुज्ञेय राहील.
2.अर्जदाराने इतर वापर करावयाचा झाल्यास वापराकरीता वेगळा अर्ज करून मंजूरी प्राप्त करून घ्यावी.
3.अर्जदाराला मूळ अकृषक आदेशातील सर्व अटी जशाच्या तशा लागू राहतील.
4.नगर रचनाकार यांचे यापूर्विचे मुळ अकृषक करीता देण्यात आलेल्या शिफारस अभिप्रायातील अटी जशाच्या तशा लागू राहतील.
5.सदर क्षेत्राकरीता शासन मंजूर ब व क वर्ग नगर पालिकांकरीता लागू असलेली बांधकाम विकास नियंत्रण नियमावली लागू आहे. त्यामधील नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
6.एकत्रिकरणाचे नकाशा व बांधकामास स्थानिक मंजूर प्राधिकरण / मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.
7.सदर जागेची मोजणी संबंधित विभागाकडून करून घेणे बंधनकारक राहील.
8.सदर जागेवर बांधकाम करतांना अर्जदाराला संबंधीत प्राधिकरणाकडून जागेचा नकाशा मंजूर करणे बंधनकारक राहील. तसेच त्यामधील अटींचे तंतोतंत पालन करावे लागेल.
9.सदर भूखंडाची खरेदी-विक्री व इतर करार होईल त्यावेळी हा आदेश व मंजूर एकत्रिकरण नकाशा विक्रीपत्र / कराराचा एक भाग म्हणून जोडण्यात यावा.
10.विषयांकीत भूखंडाचे मालकी हक्क भुखंडाच्या हदी व क्षेत्रफळा बाबत तफावत अथवा काही वाद उपस्थित झाल्यास शिफारस रदद समण्यात यावी.
11.नगर रचनाकार, वर्धा यांचे पत्र क्र. 550/2020 दिनांक. 06/03/2020 मधील अटींचे तंतोतंत पालन करावे लागेल.

उपविभागीय अधिकारी,
वर्धा

प्रतिलिपी :-

1. तहसिलदार, वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
2. तलाठी सावंगी (मेघे) ता. जि.वर्धा यांना आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.
3. अर्जदार श्री. गणेशलाल मोतीलाल साहु रा. वर्धा ता. जि.वर्धा यांना माहिती करीता अग्रेषित.

उपविभागीय अधिकारी,
वर्धा